
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2024
तरुण भारत



कोल्हापूर :कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रा. ऊ रेखा जरग. सोबत प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# रेखा जरग यांना एनएसएस उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीकडून अभिनंदन

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागप्रमुख प्रा. रेखा जरग यांना सन २०२२–२०२३ साठीचा राष्ट्रीय, सेवा, योजना कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी उत्तेजनार्थ पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाकडून दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार असून शिवाजी विद्यापीठाच्या सेवा योजनेच्या सोहळ्यानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कलगुरू, डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रशस्तीपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप होते.

या पुरस्कारासाठी निवड करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक उपक्रम, व्याख्याने, चर्चासत्रे, अधिवेशन सहभाग, अध्यापन व मुल्यमापनाचे काम, हे निकष लावण्यात आले होते.

प्रा. रेखा जरग यांना १० वर्षाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रदिर्घ अनुभव असून त्यांनी आतापर्यंत स्त्री सुरक्षा, महिला सबलीकरणवर एन. एस. एस. च्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, मानद संचालक डॉ. एच. एम. कदम तसेच भारती विद्यापीठाच्या कॉलज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. भाटीया यांनी त्यांचे या यशाबदल अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2024
तरुण भारत

# डॉ. महाजन यांना फेलो सन्मान

## ▪ उदयपूर येथे झालेल्या परिषदेत सन्मान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना त्यांच्या वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील योगदानाबद्दल इंडियन कॉमर्स असोसिएशनने फेलो म्हणून सन्मानित केले आहे. उदयपूर येथे नुकत्याच झालेल्या ७५ व्या अखिल भारतीय वाणिज्य परिषदेत गुरू गोविंद जनजातीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. के. माथूर यांच्या हस्ते डॉ. महाजन यांचा सन्मान केला.

डॉ. महाजन यांनी अकौंटन्सी व फायनान्स या विषयांचे अध्यापन केले आहे. अकौंटन्सी, फायनान्स, उद्योजकता विकास, काजू प्रक्रिया व अन्न प्रक्रिया उद्योग, ग्रामीण व्यवस्थापन या विषयांवर संशोधन केले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद तसेच शिक्षण मंत्रालयाच्या इम्प्रेस या योजनेचे अनुदान त्यांच्या संशोधन प्रकल्पांना प्राप्त झाले. उद्योजकता विकास व वित्तीय समावेशन या विषयावर हे संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. २० विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी.चे संशोधन पूर्ण केले आहे. डॉ. महाजन व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे विभागप्रमुख म्हणून त्यांनी अकरा वर्षे काम पाहिले आहे. वित्तीय व्यवस्थापन व अधिकोशीय अनुसंधान या विषयातील दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे रा.ना. गोडबोले अध्यासनाचे प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तसेच विद्यापीठ अनुदान आयोग स्थापित सामाजिक समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. कुलगुरू व प्र-कुलगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली एम. बी. ए. ऑनलाइन, बी. कॉम. (बी.एफ.एस.आय.) व बी. बी. ए., एम. बी. ए. (इंटिग्रेटेड) असे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठास आज सुट्टी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठास गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी नरक चतुर्दशी दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही सुट्टी विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर व प्रशासकीय विभागांना लागू असणार आहे. कुलगुरूंच्या अधिकारामध्ये एकूण तीन सुट्ट्या आहेत. त्या अधिकाराचा वापर करून ही सुट्टी दिल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2024
लोकमत

# व्यावसायिक अभ्यासक्रमांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर हिवाळी सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास १४ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत झालेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रथम वर्ष/प्रथम सत्र फ्रेश विद्यार्थी व थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांना १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येऊ शकेल. ५० रुपये विलंब शुल्कासहित १९ नोव्हेंबरपर्यंत तर ५० ते ३०० रुपये या अतिविलंब शुल्कासहित २१ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2024
सकाळ

# व्यावसायिक अभ्यासक्रमांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. त्यात विनाविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरु होणाऱ्या हिवाळी सत्रातील परीक्षा विद्यापीठाने अभ्यासक्रम अपूर्ण असल्याने पुढे ढकलल्या. त्यानुसार पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा १२ नोव्हेंबर, तर पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा २५ पासून सुरू आहेत. त्यानंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा टप्पा आहे. या अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासहीत भरण्याची मुदत १४ नोव्हेंबर, तर विलंब शुल्कासह १९ आणि अतिविलंब शुल्कासह २१ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती विद्यापीठाच्या प्री-एक्झाम विभागाचे उपकुलसचिव निवास माने यांनी दिली आहे.